# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रेसनोट

- **मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आयुक्तांची शहरातील विविध ठिकाणी भेटी**

मिरा-भाईंदर महानगरपालिका शहरात स्वच्छतेच्या दृष्टीने विविध मोहीम आणि अभियानं सातत्याने राबवत आहे. या मोहिमांसाठी कायमच संवेदनशील असलेले मिरा-भाईंदर महापालिकेचे मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी शहरातील विविध ठिकाणी अनपेक्षित भेट देऊन स्वच्छतेची पाहणी केली. सदर भेटीच्या पहिल्या टप्प्यात मा. आयुक्त यांनी प्रभाग समिती क्र. 5 मधील मिरा रोड स्टेशनवरील परिसरात जाऊन स्वच्छतेचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी तेथील संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना स्वच्छतेसंबंधी सूचनाही दिल्या. त्यानंतर, मा. आयुक्त यांनी सुभाषचंद्र बोस मैदान, भाईंदर पश्चिम येथे जाऊन स्वच्छतेची पाहणी केली आणि स्थानिक अधिकाऱ्यांना संबंधित सूचनांबाबत मार्गदर्शन केले. याशिवाय, मा. आयुक्त यांनी भाईंदर पश्चिम येथील कोंडवाडा देखील पाहणी केली आणि तेथील तबेल्याचे मालक तसेच महापालिका कर्मचाऱ्यांना सफाईच्या बाबतीत विशेष सूचना दिल्या.

याप्रसंगी उपायुक्त श्री. सचिन बांगर आणि उपायुक्त ( मुख्यालय )श्रीमती कल्पिता पिंपळे तसेच कर्मचारी उपस्थित होते.

ही अशी अनपेक्षित भेट मिरा भाईंदर शहरातील स्वच्छतेच्या बाबतीत महत्त्वाची असून, आगामी काळात मिरा भाईंदर शहरातील नागरिकांमध्ये जनजागृती होऊन स्वच्छतेच्या बाबतीत ते आणखीन जागरूक होतील.

Scanned with CamScanner